Vol 4 Issue 9 March 2015

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-9 | March-2015
Available online at www.aygrt.isrj.org

# महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांचा संक्षिप्त आढावा

**कबाडे साईनाथ शंकरराव**

[1]शोधर्त्री

**सारांश :-** भारतीयांनी आपली संस्कृती, परंपरा, साहित्यांबरोबरच विविध धर्म, भाषा, प्रांत अशा अनेक गुणांनी वेगळेपण जतन केलेले आहे. या भारतीय संस्कृतीस वेगळेपण प्राप्त करून देण्यास येथील परंपरा, भाषा, प्रांत आणि धर्माची भूमिका फार महत्त्वाची आहे. कारण भारतात उदयास आलेल्या धर्मांचे तत्वज्ञान सर्व मानवास अधिक प्रगल्भ करतात. भारतात हिंदू, जैन, बौध्द आणि शीख अशा धर्माचा उदय आणि प्रचार, प्रसार झाला आहे. आपणास या धर्माची जाणीव, ओळख, येथील मंदिरे, तीर्थक्षेत्रे, स्तुप, लेण्या, गुरूद्वारे करवून देतात. सोबतच भारताबाहेर उदयास आलेल्या परंतु भारतात आढळणाऱ्या ख्रिश्चन, इस्लाम, पारसी धर्माची धार्मिक स्थळे व त्यांची विविध स्थापत्ये भारताच्या इतिहासाची संपन्नता स्पष्ट करतात.

**मुख्य शब्द –** .आपली संस्कृती,भारतात हिंदू, जैन, तीर्थक्षेत्रे, स्तुप, लेण्या, गुरूद्वारे

## प्रस्तावना

भारतीय समाजास वैदिक काळानंतर जैन व बौध्द धर्माची ओळख झालेली दिसून येते. जैन धर्माच्या अहिंसा, अपरिग्रहवाद, अनेकांतवाद, कर्मवाद, समतावाद आणि वस्तुस्वातंत्रवाद या तत्वांमुळे भारतीय तत्वज्ञान व्यापक झाले आहे. इ.स.पूर्व सहाव्या शतकात जैन धर्माच्या उदयाचा विचार केला जातो. भगवान महावीरांना जैन धर्माचे प्रवर्तक आणि चोवीसावे तीर्थंकर मानले जाते. म्हणजेच महावीरांच्या पूर्वी तेवीस तीर्थंकर होऊन गेले आहेत. या तेवीस तीर्थंकरांमध्ये पहिले वृषभनाथ तर तेवीसावे पार्श्वनाथ तीर्थंकर महत्त्वाचे समजले जाते. वृषभनाथांनी जैन धर्माची स्थापना केली आणि तेंव्हापासून महावीरापर्यंतच्या तीर्थंकरांनी जैन धर्माचा प्रसार आणि प्रचार केला असे जैन परंपरा मानते. परंतु तेवीसावे तीर्थंकर पार्श्वनाथ आणि चोवीसावे तीर्थंकर महावीर या तीर्थंकरांचीच ऐतिहासिकता आज स्पष्ट झाली आहे.

भारतीय धर्म परंपरेत जैन धर्माचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कारण या धर्माचे प्राचीनत्व आणि तत्त्वज्ञानामुळे हा धर्म विशेष ठरतो. प्राचीन भारताच्या इतिहासातून आपणांस जैन धर्माच्या अस्तित्वाची अधिक माहिती मिळते. तसेच प्राचीन काळापासून वेगवेगळ्या राजकर्त्यांनी जैन धर्माचा आपल्या जीवनात स्विकार केलेला आणि राजाश्रय दिलेला दिसतो. यासाठी वेरूळ, धाराशिव या लेण्यांची उदाहरणे देता येतील.

उत्तर भारतात उदयास आलेला जैन धर्माचा प्रसार भारतभर झालेला दिसून येतो. जैन धर्माच्या उदयापासून या धर्मास कमी अधिक संख्येने अनुयायी मिळाले. आज भारतात जैन धर्मियांची संख्या पन्नास लाख असून जैन धर्माचे अस्तित्व दिसून येते. या अस्तित्त्वाची ठळक वैशिष्ट्ये त्यांच्या तीर्थक्षेत्रांवर पहावयास मिळतात.

प्रत्येक धर्मात अनेक प्रसिध्दीस आलेली स्थळे असून त्यांना तीर्थक्षेत्रे असे म्हणतात. जैन धर्मात तीर्थक्षेत्रांना महत्त्वाचे स्थान आहे. कारण धर्मावरील श्रध्दा शुध्द राहण्यासाठी तीर्थयात्रा सतत करावी अशी प्रथा जैन आचार शास्त्रातून दिसून येते. अशा तीर्थवंदनेसाठी प्रसिध्द असलेली जैनांची अनेक तीर्थक्षेत्रे भारतभर पहावयास मिळतात. जैन श्रावक व साधू यांची तीर्थवंदना करण्याची पध्दत जैन परंपरेत पूर्वीपासूनच आहे. भारतभर दोनशे बत्तीस जैन तीर्थक्षेत्रे आहेत. यापैकी महत्त्वाची समजली जाणारी सम्मेदशिखरजी, पावापुरी, चंपापुरी, गिरनार आदि तीर्थक्षेत्रे पूर्व व उत्तर भारतात बहुसंख्य असली तरी दक्षिण भारतातही त्यांची संख्याा मोठ्या प्रमाणात आहे.

जैन धर्मियांची तीर्थक्षेत्रे मुख्यतः डोंगरावर अगर अत्यंत निसर्गरम्य, एकांत जागी असतात. या तीर्थक्षेत्रांचे रक्षण व तेथे येणाऱ्या यात्रेकरूंना प्रवाशांच्या निवासाच्या सोयी उपलब्ध करून देणे हे त्या त्या भागातील जैन श्रावकांचे आवश्यक कर्तव्य समजले जाते. प्रत्येक तीर्थक्षेत्रातील स्थानिक कमिटी आपल्या भागातील तीर्थक्षेत्रांची देखभाल व संरक्षण त्या त्या प्रांतातील जैन समाजाच्या, संघटनेच्या सहाय्याने करतात.

भारतात एकूण २३२ जैन तीर्थक्षेत्रे असून या जैन तीर्थक्षेत्रांना सिध्दक्षेत्र, कल्याणकक्षेत्र, अतिशयक्षेत्र आणि कलाक्षेत्र अशा प्रकारांमध्ये ओळखले जाते. सिध्दक्षेत्र म्हणजे ज्या ठिकाणी तीर्थंकरांचे, जैन मुनीचे निर्वाण झाले असे ठिकाण होय. कल्याणकक्षेत्र म्हणजे ज्या ठिकाणी तीर्थंकरांचे पाच कल्याणक घडले आहेत असे क्षेत्र होय तर अतिशयक्षेत्र म्हणजे ज्या ठिकाणी जैन धर्माची संस्कृती आणि परंपरा टिकविण्याचा प्रयत्न झाला आहे. तेथील मंदिर व मूलनायकाची मूर्ती प्राचीन आहे तेथे जैन मुनींचा सहवास लाभलेला आहे त्या क्षेत्रावर अतिशय (चमत्कार) घडलेले आहेत ते क्षेत्र होय. कलाक्षेत्र म्हणजे ज्या ठिकाणी जैन धर्माच्या परंपरा, संस्कृतीच्या आधारे शिल्प, स्थापत्य उभारलेले क्षेत्र होय. महाराष्ट्रात एकूण चौतीस जैन तीर्थक्षेत्रे आहेत. यात सिध्दक्षेत्रे पाच, अतिशयक्षेत्रे चोवीस आहेत तर कलाक्षेत्र पाच आहेत. परंतु महाराष्ट्रात कल्याणकक्षेत्र आढळत नाही.

ज्या ठिकाणी जैन तीर्थंकर, मुनींनी सिध्दत्व प्राप्त केले आहे, अशी अनेक सिध्दक्षेत्रे महाराष्ट्रात आहेत. त्यामध्ये मांगी-तुंगी, गजपंथ, कुंथलगिरी, कुंडल, मुक्तागिरी ही पाच सिध्दक्षेत्र आहेत तर प्राचीन इतिहास असलेली जैन मंदिर आणि मूर्ती, जैन मुनींचा सहवास लाभलेल्या, त्या क्षेत्रावर चमत्कार (अतिशय) असणारी अतिशयक्षेत्रे महाराष्ट्रात कुम्भोज (बाहुबली), जिंतुर (नेमगिरी), शिरपूर, कारंजा, रामटेक, तेर, शिरड-शहापूर, नवागढ (उखळद), कचनेर, जटवाडा, पैठण, भातुकली जैन, काठी सावरगांव, आष्टा-कासार, दहिगांव, कौडण्यपूर, बाढौणा, पंचालेश्वर (नंदिश्वर), विजयगोपाल, कौठाळा, आसेगांव, मांडल, केसापूरी, कुन्थुगिरी ही आहेत. तसेच महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गुहा मंदिरे आणि गुफा आहेत. पर्वतांना खोदून बनविलेल्या या गुफा आणि त्यात कोरलेल्या मूर्ती यामधून जैन स्थापत्य कलावैभव दिसून येते. अशा ठिकाणांना उत्कृष्ट जैन कलाक्षेत्रे समजली जातात. या ठिकाणाच्या स्थापत्य, शिल्पकला यातून जैन संस्कृती, परंपरेचा बोध होण्यास मदत होते. वेरूळ लेणी, धाराशिव लेणी, औरंगाबाद लेणी, चांदवड लेणी आणि अंजनेरी लेणी ही जैन कलातीर्थ समजली जातात.

ही जैन तीर्थक्षेत्रे प्राचीन आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यात तीर्थक्षेत्रांवरील मंदिरे, मूलनायकाची मूर्ती, इतर जैन प्रतिमा, प्रतिके व मूर्त्या, मानस्तंभ, जैन मुनींची व्यवस्था, लेणी समुह, तीर्थक्षेत्रांवरील देवस्थान समितीमार्फत चालविले जाणारे विविध प्रकल्प, धर्मशाळा, गुरूकुल, विद्यालये, ग्रंथालये, वसतिगृहे, वार्षिक उत्सव, ऐतिहासिक घटना, दानपत्रे (ताम्रपत्र), शिलालेख, वीरगळ, तसेच तीर्थक्षेत्रांविषयी असलेल्या आख्यायिका इत्यादींचा समावेश होतो.

महाराष्ट्रातील कांही जैन तीर्थक्षेत्रे लोकवस्तीत (गावात) तर काही तीर्थक्षेत्र दूर निसर्गसंपन्न ठिकाणी व उंच टेकडीवर उभारलेली आहेत. कांही तीर्थक्षेत्रांवर एकच मंदिर दिसते तर कांही तीर्थक्षेत्रांवर मंदिर समुह पहावयास मिळतो. या मंदिरामध्ये वेगवेगळ्या तीर्थंकरांच्या मूर्त्या स्थापन केलेल्या दिसतात. ही मंदिरे भव्य व प्राचीन असून त्यात गर्भगृह, अंतराळ, सभामंडप, शिखर इत्यादी घटकांचा समावेश होतो. या मंदिराचे स्तंभ, प्रवेशद्वार, छत, मुखमंडप, शिखर, मानस्तंभ नक्षीकामाने सुशोभित केलेली दिसतात. मंदिराच्या शिखरावरही छोटे मंदिर दिसते. त्यात रत्नत्रय किंवा तीर्थंकरांची मूर्ती स्थापन केलेली दिसते. ही मंदिरे काळा पाषाण, विटा, लाकडी वस्तूपासून उभारलेली दिसतात. मंदिर प्रकारात हेमांडपती मंदिर प्रकार हा अधिक प्रमाणात पहावयास मिळतो. परंतु कालांतराने गरजेनुसार मंदिरांचा जिर्णोध्दार केलेला दिसतो. काही तीर्थक्षेत्रांवर आधुनिक मंदिरे उभारलेली आहेत तर काही तीर्थक्षेत्रांवर काचमंदिरे पहावयास मिळतात. या मंदिरास तटबंदी व भव्य मुख्यप्रवेशद्वारही आढळून आले आहे.

तीर्थक्षेत्रांवरील मंदिराच्या वेदीवर मूलनायकाची मूर्ती स्थापन केलेली दिसते. ही तीर्थंकर मूर्ती असून ती पद्मासनस्थ ध्यानमुद्रेतील आहे. इतर मूर्त्या श्वेत व श्यामवर्ण पाषाणापासून तर काही वाळूपासून बनविलेल्या दिसतात. या मूर्त्या भव्य असून त्या लांच्छन, चमरेंद्र, दुंदभीवादक, इंद्र, यक्ष-यक्षी, छत्रत्रयी, विविध प्राणी, सिंहासन यांनी सुशोभित केलेल्या दिसतात.

महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रांवरील तीर्थंकर मूर्त्यांमध्ये आदिनाथ, शांतिनाथ, मुनिसुव्रतनाथ, चंद्रप्रभु, पार्श्वनाथ, महावीरांच्या प्रामुख्याने मूर्त्या आढळतात. यापैकी पार्श्वनाथाच्या मूर्ती जास्त प्रमाणात दिसतात. या मूर्त्या लहान व भव्य असून पार्श्वनाथाच्या डोक्यावर पाच, सात, नऊ, अकरा, तेरा नागफणा असलेले छत्र पहावयास मिळते. येथे पार्श्वनाथाची वेगवेगळी नांवे ही ऐकण्यास मिळतात त्यात कलिकुंड पार्श्वनाथ, गिरी पार्श्वनाथ, झरी पार्श्वनाथ, अंतरिक्ष पार्श्वनाथ, चिंतामणी पार्श्वनाथ, विघ्नहर पार्श्वनाथ इत्यादींचा समावेश होतो. जैन परंपरेच्या मतानुसार महाराष्ट्राच्या भूप्रदेशावर पार्श्वनाथाचा विहार झाला होता असे सांगितले जाते.

या तीर्थंकरांच्या मूर्त्या आकर्षक असून त्यांच्या चेहऱ्यावर विरक्तता, शांततेचा भाव पहावयास मिळतो तर काही मूर्त्यांच्या छातीवर श्रीवत्स चिन्ह दिसते तर काही मूर्त्यांच्या छातीवर श्रीवत्स चिन्ह दिसत नाही. मूर्त्यांच्या कानाच्या ठेवणीत ही फरक आढळतो. म्हणजेच काळानुसार मूर्तीकलेत जो बदल होत गेला तो बदल या मूर्त्यांमध्ये ही दिसून येतो. या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी एक हजार वर्षापूर्वीच्या प्राचीन मूर्त्या पहावयास मिळतात. काही मूर्त्यांवर लेख कोरलेले आहेत त्यावरून या मूर्त्यांचा काळ ठरविण्यास मदत होते. मूर्त्यांवरील वर्षाच्या उल्लेखात विक्रम संवत्, शक, शक संवत् या कालगणनेचा जास्त वापर झालेला दिसतो.

तीर्थंकरांच्या मूर्त्यांसोबत पद्मावती, अंबिका, ज्वालामालिनी, सरस्वती या शासन देवता ही पहावयास मिळतात. या

देवी मूर्ती चार, सहा, आठ हात असलेल्या विविध अलंकारयुक्त असून सोबतच मंदिरांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण क्षेत्रपालांच्या मूर्त्यांही आहेत. मंदिराच्या परिसरात चौबीसी तीर्थंकरांच्या पद्मासन व खड्गासनातील पाषाण मूर्त्या व चरण चिन्ह पहावयास मिळतो तर काही मंदिरात शिलालेख, वीरगळ तर काही तीर्थक्षेत्रांवर समवशरण मंदिर ही आढळून आले. मंदिरासमोर काळ्या, पांढऱ्या, लाल दगडापासून बनविलेले लहान-मोठे कलाकुसरीनी सुशोभित केलेली मानस्तंभ आहेत.

मुक्तागिरी येथे शांतिनाथाचे तर तेर आणि कुंडल येथे महावीरांचे समवशरण आले होते असे या क्षेत्रांवर सांगितले जाते. यामुळे या तीर्थक्षेत्रांची प्राचीनता समजण्यास मदत होते. या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी विशेष उत्सव, धार्मिक समारंभावेळी जैन धर्मगुरू मार्गदर्शन करतात व या समारंभावेळी प्रमुख राजकीय व्यक्तींना आमंत्रित केलेले असते.

प्रत्येक तीर्थक्षेत्रांवर नेमणूक केलेल्या पंडिताकडून नित्यपूजा केली जाते. वर्षभर विविध उत्सव व वार्षिक उत्सवही साजरे केले जातात. वार्षिक उत्सवात काही ठिकाणी पालखी मिरवणुक तर काही ठिकाणी रथ मिरवणुक काढली जाते. या उत्सवात जैन-जैनत्तरांचाही समावेश असतो. प्रत्येक तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी यात्रेकरूंना राहण्या-जेवण्याच्या सोयीसाठी धर्मशाळा उभारलेल्या असून येथे यात्रेकरूंची उत्तमरित्या राहण्याची व जेवणाची सोय केली जाते.

आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तीर्थक्षेत्र ठिकाणी चालवली जाणारी गुरूकुल, विद्यालय पध्दती होय. कुंभोज (बाहुबली), कुंथलगिरी, पैठण, कचनेर, नवागड अशा तीर्थक्षेत्रांवर गुरूकुलाच्या माध्यमातून शैक्षणिक सेवा दिली जाते. याकिाणी मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेतात. म्हणजेच आजच्या काळात सुध्दा ही तीर्थक्षेत्रे प्राचीन भारताच्याा शिक्षण पध्दतीचे वैशिष्ट्य असणारे गुरूकुल पध्दती आजही जतन करीत आहेत. या विद्यार्थ्यांना वसतिगृहामार्फत राहण्याची व जेवणाच्या सुविधा दिल्या जातात. सोबतच या ठिकाणी असलेली ग्रंथालयामध्ये यातून विविध भाषेतील, जैन ग्रंथ, साहित्य, तत्वज्ञान सांगणारी पुस्तके जतन केलेली आहेत.

कुंभोज (बाहुबली) या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जैन संशोधन केंद्र असून तेथून विविध ग्रंथ, मासिक प्रकाशित होताना दिसतात तर प्रत्येक तीर्थक्षेत्रा ठिकाणी देवस्थान समिती स्थापन केलेल्या आहेत. या देवस्थान समितीमार्फत तीर्थक्षेत्रांचे व्यवस्थापन केले जाते. ही तीर्थक्षेत्रे पर्यावरणाचे संरक्षण करताना दिसतात. कारण ही तीर्थक्षेत्रे निसर्गसंपन्न आणि उंच पहाडांवर असून पर्यावरण, पशु व वृक्ष संवर्धन करतात.

या सर्व वैशिष्ट्यांमुळे येथे येणाऱ्यांची संख्या मोठी असल्याने ही जैन तीर्थक्षेत्रे पर्यटनाचा एक भाग बदली आहेत. यामध्ये बाहुबली व कुंथलगिरी येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या जास्त आहेत. बऱ्याच तीर्थक्षेत्रांवर लेणी समूह पहावयास मिळतो तर काही लेणी समूह जैन कलाक्षेत्र म्हणून प्रसिध्द असून वेरूळ, धाराशिव, औरंगाबाद, अंजनेरी येथील लेणी समूह जैन धर्माच्या प्राचीनतेची साक्ष देतात. या लेणी सातव्या, आठव्या व नवव्या शतकातील असून महत्त्वाच्या आहेत.

अलिकडील काळात या तीर्थक्षेत्रांचे आधुनिक स्वरूप दिसत असले तरी ही तीर्थक्षेत्रे सुमारे एक हजार वर्षांपूर्वीची प्राचीन अशी आहेत. मुक्तागिरी येथील जैन मंदिर बिंबीसार या राजाने स्थापन केल्याचे माहिती मिळते. या तीर्थक्षेत्रांच्या प्राचीनतेविषयी येथील मूर्तीवरील लेख, शिलालेख, ताम्रपत्र माहिती सांगतात तर कांही तीर्थक्षेत्रांचा उल्लेख जैन कवी, भट्टारकांच्या काव्य व साहित्य रचनेत आलेला दिसतो.

ही तीर्थक्षेत्रे धर्माचा प्रचार व प्रसार करणारी स्थळे आहेत. या सर्व तीर्थक्षेत्रांच्या ऐतिहासिक आढाव्यातून तीर्थक्षेत्रांचा उदय, तीर्थंकरांची तपश्चर्या, चिंतन, मार्गदर्शन यातून या ठिकाणी झालेला धर्मप्रचार व प्रसार, जैन मूर्तीकला, मंदिरकला, स्थापत्यकला, लयनस्थापत्य, पूजाविधी, उत्सव, विविध राजांनी दिलेला राजाश्रय आणि इतर धर्मियांनी केलेले सहकार्य याची कल्पना येते.

आज पर्यटन या विषयीची चर्चा भारतीय सामाजिकशास्त्रात सुरू आहे. पर्यटन क्षेत्राचा विकास करून भारतीय संस्कृती, धर्म, तत्वज्ञान याची जगाला ओळख सांगण्याचा प्रयत्न सुरू आहे. महाराष्ट्र धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने चौफेर समृध्द असून, आधुनिक पर्यटनांची संख्या वाढत असल्याने आता महाराष्ट्र पर्यटनाच्या क्षेत्रात पुढे आहेत. यात जैन तीर्थक्षेत्रांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. परंतु महाराष्ट्रात वेरूळ, अजिंठा यासारखी ठिकाणे पर्यटन क्षेत्रे म्हणून पुढे आली. या तुलनेत इतर जैन तीर्थक्षेत्रे दुर्लक्षित झाली. पर्यटन क्षेत्र विकासाला चालना मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्यास जैन धर्माची प्राचीन पार्श्वभूमी समजण्यासाठी जैन तीर्थक्षेत्रे सुध्दा महत्त्वाचे ठरतात.

आधुनिकीकरण आणि औद्योगिकीकरणांमुळे आजचा मानव यंत्रवत झाला आहे. या प्रगतीमुळे मानवी जीवन मूल्यांचा संकोच सुरू झाला आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळे शस्त्रास्त्र स्पर्धेतून निर्माण झालेल्या तणाव आणि हिंसेला उत्तर म्हणून जैन धर्माच्या तत्वज्ञानाकडे पाहता येते. यासाठीच ''अहिंसा परमोधर्म'' अशी मानवी मूल्यांची शिकवण देणाऱ्या जैन धर्माची ओळख करणे ही वर्तमानकालीन गरज वाटते.

### *संदर्भ ग्रंथ*

१.संगवे विलास, जैन धर्माची रूपरेखा, गुलाबचंद वालचंद डुडो प्रकाशन फलटण, १९७३.
२.डांगे सिन्धू, जैन धर्म आणि तत्वज्ञान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, २०१३.
३.किर्ती पार्श्व, विश्वधर्म की रूपरेखा, राजस्थान जैन सभा प्रकाशन जयपूर, १९३५.
४.अन्नदाते श्रेणिक, जैन ऐतिहासिक, सुमेरू प्रकाशन सोलापूर, २००२.
५.संगवे विलास, जैन संस्कृती-परंपरा व प्रभाव, अनेकांत शोधपीठ प्रकाशन कोल्हापूर, १९१९.

६.नथमल, ध्यान और कायोत्सर्ग, भारत जैन महामण्डल प्रकाशन मुंबई, १९७४.
७.नतालिया गुसेवा (मराठी अनुवादक) कुलकर्णी जी. पी., जैन धर्म उगम व विकास, शब्दपीठ प्रकाशन कल्याण, १९७६.
८.मगदूम अप्पाभाऊ, जैन धर्माची ओळख, श्रीवीर ग्रंथमाला प्रकाशन सांगली, १९४०.
९.जैन धरमचन्द्र, प्रागैतिहासिक जैन परंपरा, भारत जैन महामंडळ प्रकाशन मुंबई, १९७५.
१०.ुक्ल रामचंद्र, मॅगेस्थनिज का भारतवर्षीय वर्णन, इतिहास प्रकाशन समिती काशी, १९०५.
११.शहा सुमतिबाई, पूर्णार्ध्य जैन ज्ञानकोश, श्राविकाश्रम प्रकाशन सोलापूर, १९९९.



***कबाडे साईनाथ शंकरराव***
शोधर्त्री

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org